# प्रकरण - ४

## तथ्य संकलनावर आधारीत सारणी

## प्रकरण ४ थे

## तथ्य संकलनावर आधारीत सारण्या

सारणी क्रमांक १ :-

कामगार शिक्षण वर्गात स्त्री पुरुषांचे प्रमाण दर्शवणारी सारणी :

| लिंग | कामगारांची संख्या | प्रमाण |
|---|---|---|
| १) स्त्रीया | १० | ८•३३ |
| २) पुरुष | ११० | ९१•६७ |
| | १२० | १००•०० |

अ) पृथ:करण :

१) ८•३३ टक्के स्त्री कामगारांनी कामगार शिक्षण वर्गात घेतलेला होता•

२) ९१•६७ टक्के पुरुष कामगारांनी कामगार शिक्षण वर्गात भाग घेतला होता•

ब) स्पष्टीकरण :

वरील सारणीवरून कामगार शिक्षण वर्गात पुरुष वर्ग जास्त प्रमाणात (९१•६७ टक्के) दिसून येतो• वरील प्रकारची परिस्थिती दिसून येण्याचे कारण असे असावे की, मिलमधील सर्व कामे कठीण श्रमावर आधारित आहेत• स्त्रियांना त्यांच्या शारिरीक गुणधर्मानुसार कमी श्रमाची कामे द्यावे लागतात• तसेच मिलमध्ये

तीन पाळ्यांमध्ये काम चालत असते. त्यातील दोन पाळ्या रात्री चालत असतात. रात्री ९ ते सकाळी ६ वाजेपर्यंत स्त्रियांना कामास लावण्यास नियमाने बंदी आहे.[१] यामुळे मिल मध्ये स्त्री कामगाराचे प्रमाण अत्यल्प आहे. यामुळे मिलमध्ये पुरुष वर्ग जास्त प्रमाणात नोकरीस आहे. या कारणास्तव कामगार शिक्षण वर्गात पुरुषांचा सहभाग जास्त प्रमाणात दिसत असावा.

---

१. 66.(b) No woman shall be (required or allowed to work in any factory) except between the hours of 6 a.m. to 7 p.m.

Provided that the (State) Government may, by notification in the official Gazette in respect of (any factory or group or class or description of factories) vary the limits laid down in clause (b) but so that no such variation shall authorise the employment of any woman between the hours 10 p.m. and 5 a.m. - The Factories Act 1948 and The Maharashtra Factories Rules, 1963 - P-39.

सारणी क्रमांक २ :-

कामगार शिक्षण वर्गातील कामगारांच्या धर्माविषयी माहिती दर्शवणारी सारणी.

| धर्म | कामगारांची संख्या | प्रमाण |
|---|---|---|
| १) हिंदू | १०४ | ८६.६७ |
| २) मुस्लीम | १६ | १३.३३ |
| ३) ख्रिश्चन | - | - |
| ४) जैन | - | - |
| | १२० | १००.०० |

अ) पृथःकरण :-

१) ८६.६७ टक्के हिंदू कामगारांनी कामगार शिक्षण वर्गात भाग घेतला होता.

२) १३.३३ टक्के मुस्लीम कामगारांनी कामगार शिक्षण वर्गात भाग घेतला होता.

ब) स्पष्टीकरण :-

वरील सारणीवरून कामगार शिक्षण वर्गात हिंदू धर्मातील कामगारांचे जास्त प्रमाण (८६.६७%) दिसून येते. याचे कारण असे असावे की, मुस्लीम, ख्रिश्चन

जैन हे धर्म अल्पसंख्याक म्हणून संबोधले जातात. सोलापूर शहरात अल्पसंख्यांक धर्मापेक्षा हिंदू धर्माची लोकसंख्या जास्त प्रमाणात (७६.०६) आहे.[२] तसेच ख्रिश्चन व जैन धर्मातील लोक अतिशय कमी प्रमाणात आहेत. जैन धर्मातील लोक उच्च व्यवसायात गुंतलेला आहे. हिंदू धर्मातील जास्त लोकसंख्येमुळे कामगार शिक्षण वर्गात हिंदूचे जास्त प्रमाण आहे.

---

२.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | बौध्द | ३.५९ | (१८,४९६) |
| २) | ख्रिश्चन | १.०२ | (५,२६१ ) |
| ३) | मुस्लीम | १८.०५ | (९२,९८२) |
| ४) | हिंदू | ७६.०६ | (३,९१,६२५) |
| ५) | जैन | १.२१ | (६,२८१) |
| ६) | शिख | ०.०२ | (११४) |
| ७) | इतर | ०.००९ | (५०) |

जिल्हा सांख्यिकीय कार्यालय
ज्ञापन अहवाल, सोलापूर

सारणी क्रमांक ३ :-

कामगारांच्या वयाची माहिती दर्शवणारी सारणी•

| वयोगट | कामगारांची संख्या | प्रमाण |
|---|---|---|
| १) १९ ते २८ | ११ | ०९•१७ |
| २) २९ ते ३८ | ५४ | ४५•०० |
| ३) ३९ ते ४८ | ३१ | २५•८३ |
| ४) ४९ ची पुढील | २४ | २०•०० |
| | १२० | १००•०० |

अ) पृथ:करण :-

१) १९ ते २८ या वयोगटातील ९•१७ टक्के कामगारांनी कामगार शिक्षण वर्गात भाग घेतला•

२) २९ ते ३८ या वयोगटातील ४५ टक्के कामगारांनी कामगार शिक्षण वर्गात भाग घेतला•

३) ३९ ते ४८ या वयोगटातील २५•८३ टक्के कामगारांनी कामगार शिक्षण वर्गात भाग घेतला•

४) ४९ पेक्षा अधिक वयाच्या गटातील २० टक्के कामगारांनी कामगार शिक्षण वर्गात भाग घेतला•


ब) <u>स्पष्टीकरण</u> :-

वरील सारणीवरून कामगार शिक्षण वर्गात २९ ते ३८ या वयोगटातील कामगार जास्त प्रमाणात (४५%) दिसून येतात. याचे कारण असे असावे की, या वयोगटातील व्यक्तींमध्ये परिपक्वता आलेली असते. या वयोगटातील कामगारांत उत्साह आढळतो व या वयोगटातील कामगार कामामध्ये स्थिर झालेले असतात. त्यामुळे या वयोगटातील कामगार वर्गामध्ये भाग घेत असावेत.

आलेख क्रमांक - १

कामगारांच्या वयाची माहिती दारवविणारी सारणी

प्रमाण - १ से.मी = १०% निवेदक



सारणी क्रमांक ४ :-

कामगारांची शैक्षणिक स्थिती दर्शविणारी सारणी.

| | शिक्षण | कामगारांची संख्या | प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | प्राथमिक | ४५ | ३७.५० |
| २) | माध्यमिक | ५७ | ४७.५० |
| ३) | उच्च माध्यमिक | ०६ | ०५.०० |
| ४) | पदवी | ०१ | ००.८३ |
| ५) | पदव्यूत्तर | ०० | ००.०० |
| ६) | पदविका | ०० | ००.०० |
| ७) | शिक्षण न घेतलेले | ११ | ०९.१७ |
| | | १२० | १००.०० |

अ) पृथःकरण :-

१) ३७.५ टक्के कामगारांचे शिक्षण प्राथमिक पर्यंतचे आहे.

२) ४७.५ टक्के कामगारांचे शिक्षण माध्यमिक पर्यंतचे आहे.

३) ५ टक्के कामगारांचे शिक्षण उच्च माध्यमिक पर्यंतचे आहे.

४) ०.८३ टक्के कामगारांचे शिक्षण पदवी पर्यंतचे आहे.

५) पदवी व पदव्यूत्तर शिक्षण घेतलेले कामगार नाहीत.

६) ९.१७ टक्के कामगारांनी शिक्षण घेतलेले नाही.

ब) स्पष्टीकरण :-

वरील सारणी वरून कामगार शिक्षण वर्गात माध्यमिक शिक्षण घेतलेल्या कामगारांचे जास्त प्रमाण ( ८५% ) दिसून येते. याचे कारण असे असावे की, मिलमधील काम अतिशय श्रमाचे व शक्तीचे आहे. पदवीधर व्यक्तीचा पांढरपेशा कामाकडे जास्त कल असतो. माध्यमिक व अल्पशिक्षित व्यक्ती मिलमध्ये कामास जातात व त्यांना आपल्या कामाविषयी शिक्षण घेण्याची व इतर माहिती प्राप्त करून घेण्याची इच्छा असावी. म्हणून कामगार शिक्षण वर्गात माध्यमिक पर्यंत शिक्षण घेतलेले कामगार जास्त प्रमाणात असावेत.

सारणी क्रमांक ५ :-

कामगारांच्या नोकरीचे स्वरूप दर्शविणारी सारणी•

| नोकरीचे स्वरूप | कामगारांची संख्या | प्रमाण |
|---|---|---|
| १) हंगामी | ०७ | ५•८३ |
| २) कायम | ११३ | ९४•१७ |
| ३) रोजंदारी | - | - |
| | १२० | १००•०० |

अ) पृथःकरण :-

१) ५•८३ टक्के हंगामी (बदली) कामगारांनी कामगार शिक्षण वर्गात भाग घेतला•

२) ९४•१७ टक्के कायम कामगारांनी कामगार शिक्षण वर्गात भाग घेतला•

ब) स्पष्टीकरण :-

वरील सारणीवरून कामगार शिक्षण वर्गात कामय स्वरूपाचे कामगार जास्त प्रमाणात (९४•१७%) दिसून येतात• याचे कारण असे असावे की, हंगामी म्हणजे बदलीवर असणा-या कामगारांना किमान कौटुंबिक गरजा पूर्ण करण्यासाठी मिलमध्ये काम न मिळाल्यास इतरत्र कामास जावे लागत असावे• तसेच ते कामाच्या चिंतेत व असमाधानी असतात• साहजिकच हंगामी कामगार शिक्षण वर्गात भाग घेत नसावेत•

सारणी क्रमांक ६ :-

कामगारांची वैवाहिक स्थिती दर्शवणारी सारणी.

| | वैवाहिक स्थिती | कामगारांची संख्या | प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | अविवाहित | २ | ०१.६६ |
| २) | विवाहित | ११३ | ९४.१७ |
| ३) | विधूर/विधवा | ५ | ०४.१७ |
| ४) | घटस्फोटित | - | - |
| | | १२० | १००.०० |

अ) पृथःकरण :-

१) १.६६ टक्के अविवाहित कामगारांनी कामगार शिक्षण वर्गात भाग घेतला.

२) ९४.१७ टक्के विवाहित कामगारांनी कामगार शिक्षण वर्गात भाग घेतला.

३) ४.१७ टक्के विधूर वा विधवा कामगारांनी कामगार शिक्षण वर्गात भाग घेतला

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

ब) स्पष्टीकरण :-

वरील सारणीवरून कामगार शिक्षण वर्गात विवाहितांचे जास्त प्रमाण (९४.१७%) आहे असे दिसून येते. विवाहानंतर व्यक्तींना अनेक जबाबदाऱ्या पार पाडण्याची जाणीव होते. त्यांच्यावर जबाबदारी येते. त्यांच्यामध्ये परिपक्वता आलेली असते. म्हणून कामगार शिक्षण वर्गात विवाहितांचे प्रमाण जास्त असावे. शिवाय, वयोमर्यादेच्या दृष्टीनेही यापैकी बहुतेक कामगार २०/२१ वयाच्या पुढील असतात. त्यामुळे त्यांची वये लग्नायोग्य झालेली असतात.

सारणी क्रमांक ७ :-

कामगारांना लिहता वाचता येणा-या भाषेची माहिती दर्शविणारी सारणी.

| भाषा | कामगारांची संख्या | | | |
|---|---|---|---|---|
| | लिहता | प्रमाण | वाचता | प्रमाण |
| मराठी | १०९ | (९०.८३%) | ११२ | (९३.३३%) |
| कन्नड | ००५ | ( ४.१७%) | ००५ | ( ४.१७%) |
| हिंदी | ०५७ | (४७.५%) | ०५९ | (४९.१६%) |
| उर्दू | ००६ | ( ५% ) | ००६ | ( ५% ) |
| इंग्रजी | ०१५ | (१२.५%) | ०१५ | (१२.५%) |

अ) पृथ:करण :-

१) मराठी भाषा ९०.८३ टक्के कामगारांना लिहिता व ९३.३३ टक्के कामगारांना लिहिता/वाचता येते.

२) कन्नड भाषा ४.१७ टक्के कामगारांना लिहिता व वाचता येते.

३) हिंदी भाषा ४७.५ टक्के कामगारांना लिहिता व ४९.१६ टक्के कामगारांना लिहिता/वाचता येते.

४) उर्दू ही भाषा ५ टक्के कामगारांना लिहिता व वाचता येते.


५) इंग्रजी ही भाषा १२.५ टक्के कामगारांना लिहिता व वाचता येते.

ब) स्पष्टीकरण :-

वरील सारणीवरुन भाषिक दृष्टया संमिश्र प्रदेश असूनही येथील कामगारांत मराठी भाषिकांचे प्राबल्य आहे, असे दिसते. इतर भाषांचे प्रमाण त्यामानाने नगण्य आहे. त्याच प्रमाणे एखादी भाषा लिहिणा-यापेक्षा वाचणा-यांचे प्रमाण अधिक कारण कामगारांना लिहिण्याचा सराव नसतो व तसे प्रसंगही कमी असतात.

आलेख क्रमांक - 2

कामगारांना लिहता वाचता येणाऱ्या भाषांची माहिती दाखवणारा आलेख.



सारणी क्रमांक ८ :-

कुटुंबातील सदस्यांची संख्या दर्शविणारी सारणी.

| सदस्य गट | कामगारांची संख्या | प्रमाण |
| --- | --- | --- |
| १) १ ते ५ | ३६ | ३०.०० |
| २) ६ ते १० | ६७ | ५५.८३ |
| ३) ११ ते १५ | १४ | ११.६७ |
| ४) १६ चे पुढे | ०३ | ०२.५० |
| | १२० | १००.०० |

अ) पृथःकरण :-

१) ३० टक्के कामगारांचे १ ते ५ दरम्यान सदस्य असलेले कुटुंब होते.

२) ५५.८३% कामगारांचे ६ ते १० दरम्यान सदस्य असलेले कुटुंब होते.

३) ११.६७% कामगारांचे ११ ते १५ दरम्यान सदस्य असलेले कुटुंब होते.

४) २.५ टक्के कामगारांचे १६ पेक्षा अधिक सदस्य असलेले कुटुंब होते.

ब) स्पष्टीकरण :-

वरील सारणीवरुन कामगार शिक्षण वर्गात १० पर्यंत कुटुंब सदस्य असलेल्या कामगारांचे जास्त प्रमाण (८५.८३%) आहे. अशा परिस्थितीचे कारण असे असावे की, मध्यम प्रमाणात सदस्य संख्या असलेल्या कुटुंबात कामगारांना इतर कार्यक्रमात भाग घेण्यास वेळ मिळतो कारण नवनवीन उपक्रमासंबंधी त्यांची मने उत्सुक असतात.

सारणी क्रमांक ९ :-

कामगारांच्या कुटुंबातील साक्षरतेचे प्रमाण दर्शवणारी सारणी•

| साक्षरता | कामगारांची संख्या | प्रमाणे |
| --- | --- | --- |
| होय | ४८ | ४०•०० |
| नाही | ०३ | ०२•५० |
| कांही साक्षर कांही निरक्षर | ६९ | ५७•५० |
| | १२० | १००•०० |

अ) पृथःकरण :-

१) ४० टक्के कामगारांच्या कुटुंबातील सर्व सदस्य साक्षर आहेत•

२) २•५ टक्के कामगारांच्या कुटुंबातील सर्व सदस्य निरक्षर आहेत•

३) ५७•५ टक्के कामगारांच्या कुटुंबातील कांही सदस्य साक्षर व कांही सदस्य निरक्षर आहेत•

ब) स्पष्टीकरण :-

वरील सारणीवरून कामगार शिक्षण वर्गात कांही साक्षर व कांही निरक्षर कुटुंब सदस्य असलेल्या कामगारांचे जास्त प्रमाण (५७•५%) आहे• याचे कारण असे असावे की, बहुसंख्य कामगारांचे आई वडिल व पत्नी निरक्षर असल्याचे दिसून येते• आपल्या जुनाट समजुतीनुसार स्त्रियांचे कार्यक्षेत्र "चूल आणि मूल" एवढ्यापूरतेच मर्यादित आहे• म्हणून स्त्रियांना शिक्षण दिले जात नसावे• तसेच पूर्वीच्या पिढीत निम्नवर्गात शिक्षण प्रसार नव्हता•

सारणी क्रमांक १० :-

कामगार शिक्षण वर्गातील कामगारांचे उत्पन्न दर्शविणारी सारणी•

| कामगारांचे उत्पन्न गट | कामगारांची संख्या | प्रमाण |
|---|---|---|
| १) रु• ५००० ते ७००० | ०१ | ००•८३ |
| २) रु• ७००१ ते ९००० | ०३ | ०२•५० |
| ३) रु• ९००१ ते ११००० | ४२ | ३५•०० |
| ४) रु• ११००० ते १३००० | ५९ | ४९•१७ |
| ५) रु• १३००१ ते १५००० | १२ | १०•०० |
| ६) रु• १५००१ चे वर | ०३ | ०२•५० |
| | १२० | १००•०० |

अ) पृथ:करण :-

१) ०•८३ टक्के कामगारांचे उत्पन्न हे रुपये ५००० ते ७००० च्या दरम्यान आहे•

२) २•५ टक्के कामगारांचे उत्पन्न हे रुपये ७००१ ते ९००० च्या दरम्यान आहे•

३) ३५ टक्के कामगारांचे उत्पन्न हे रुपये ९००१ ते ११०००च्या दरम्यान आहे•


४) ४९•१७% कामगारांचे उत्पन्न हे रुपये ११००१ ते १३००० च्या दरम्यान आहे•

५) १० टक्के कामगारांचे उत्पन्न हे रूपये १३००१ ते १५००० च्या दरम्यान आहे.

६) २.५ टक्के कामगारांचे उत्पन्न रूपये १५००१ पेक्षा अधिक आहे.

ब) स्पष्टीकरण :-

वरील सारणीवरून कामगार शिक्षण वर्गात रु. ९००१ ते १३००० च्या दरम्यान उत्पन्न असलेल्या कामगारांचे जास्त प्रमाण (८४.१७%) आहे. याचे कारण असे असावे की, कामगार शिक्षण वर्गात भाग घेतलेले कामगार कायम स्वरूपाचे आहेत. कायम नोकरी व ठराविक उत्पन्न यांची तरतूद झाल्याखेरीज कामगार कोणत्याही अन्य कार्यक्रमाकडे वळत नाहीत.


आलेख क्र. ३
कामगार शिक्षण वर्गातील कामगारांचे उत्पन्न दर्शवणारा आलेख
100
90
80
70
60
50
40
30
20
10
0
49.18%
35%
10%
2.5%
2.5%
उत्पन्न गट

सारणी क्रमांक ११ :-

वार्षिक उत्पन्नात कामगारांच्या किमान कौटुंबिक गरजा पूर्ण होतात की नाही याविषयी माहिती दर्शविणारी सारणी.

| गरजा पूर्ण होतात की नाही | कामगारांची संख्या | प्रमाण |
|---|---|---|
| होय | ५७ | ४७.५० |
| नाही | ६० | ५०.०० |
| सांगता येत नाही | ०३ | ०२.५० |
| | १२० | १००.०० |

अ) पृथःकरण :-

१) ४७.५ टक्के कामगारांच्या मते वार्षिक उत्पन्नात त्यांच्या किमान कौटुंबिक गरजा पूर्ण होतात.

२) ५० टक्के कामगारांच्या मते वार्षिक उत्पन्नात त्यांच्या किमान कौटुंबिक गरजा पूर्ण होत/नाहीत.

३) २.५ टक्के कामगारांच्या मते वार्षिक उत्पन्नात त्यांच्या किमान कौटुंबिक गरजा पूर्ण होतात की नाही या विषयी कांहीही सांगता येत नाही.

ब) स्पष्टीकरण :-

वरील सारणी वरुन असे दिसून येते की, कामगार शिक्षणवर्गातील कामगारांचे किमान कौटुंबिक गरजा त्यांना मिळणा-या वार्षिक उत्पन्नात पूर्ण होत नाहीत असे मत जास्त प्रमाणात ( ५० टक्के ) आहे त्यांच्या क्रमानंतर त्यांच्या वार्षिक उत्पन्नात किमान कौटुंबिक गरजा पूर्ण होतात अशा मतांच्या कामगारांचे प्रमाणही (४७•५० टक्के) समाधान कारक आहे•

दिवसेंदिवस वाढत चाललेल्या महागाईच्या मानाने वेतनात वाढ होत नाही त्यामुळे वाढती महागाई व वेतन यांचे प्रमाण व्यस्त आहे• त्यामुळेच त्यांच्या किमान कौटुंबिक गरजा पूर्ण होत नसाव्यात•

सारणी क्रमांक १२ :-

वार्षिक उत्पन्नात कामगारांच्या कौटुंबिक गरजा कशा पूर्ण होतात या विषयासंबंधी कारणे दर्शविणारी सारणी•

| कारणे | कामगारांची संख्या | प्रमाण |
|---|---|---|
| मर्यादित गरजा | ५३ | ९२•९९ |
| अल्पसंतती | ०४ | ०७•०१ |
| अधिक उत्पन्न | ०० | ००•०० |
| | ५७ | १००•०० |

टिप :- १२० कामगारांपैकी ५७ कामगारांनी वार्षिक उत्पन्नात कौटुंबिक गरजा पूर्ण होतात म्हणून ५७ वरुन प्रमाण काढलेले आहे•

अ) पृथःकरण :-

१) ९२•९९ टक्के कामगारांच्या मते मर्यादित गरजामुळे सदरच्या वार्षिक उत्पन्नात किमान कौटुंबिक गरजा पूर्ण होतात•

२) ७•०१ टक्के कामगारांच्या मते अल्पसंततीमुळे सदरच्या वार्षिक उत्पन्नात किमान कौटुंबिक गरजा पूर्ण होतात•

३) अधिक उत्पन्न असल्यामुळे किमान कौटुंबिक गरजा पूर्ण होतात असेही कोणीही मत व्यक्त केले नाही•

ब) <u>स्पष्टीकरण</u> :-

वरील सारणीवरुन असे दिसून येते की, सदरच्या वार्षिक उत्पन्नात मर्यादित गरजामुळे किमान कौटुंबिक गरजा पूर्ण होतात असे जास्त प्रमाणात (९२•९९ टक्के) कामगारांना वाटते याचे कारण अल्प उत्पन्न असल्यामुळे त्या उत्पन्नात आपणास जेवढया अत्यंत उपयोगी वस्तू लागतात तेवढयाच घेऊन गरजा मर्यादित ठेवल्या जातात•

सारणी क्रमांक १३ :-

वार्षिक उत्पन्नात कौटुंबिक गरजा पूर्ण कोणत्या कारणामुळे होत नाहीत यासंबंधी कामगारांचे मत दर्शविणारी सारणी.

| मत | कामगारांची संख्या | प्रमाण |
|---|---|---|
| १) जास्त गरजा | ०६ | १०.०० |
| २) जास्त संतती | ०२ | ०३.३३ |
| ३) अल्प उत्पन्न | ५२ | ८६.६७ |
| | ६० | १००.०० |

टिप :- १२० पैकी ६० कामगारांनी वार्षिक उत्पन्नात कौटुंबिक गरजा पूर्ण होत नाहीत. म्हणून उत्तर दिले म्हणून त्यांचे प्रमाण ६० वरून काढले आहे.

अ) पृथ:करण :-

१) १० टक्के कामगारांच्या मते वार्षिक उत्पन्नात जास्त गरजांमुळे कौटुंबिक गरजा पूर्ण होत नाहीत.

२) ३.३३ टक्के कामगारांच्या मते वार्षिक उत्पन्नात जास्त संततीमुळे कौटुंबिक गरजा पूर्ण होत नाहीत.

३) ८६.६७ टक्के कामगारांच्या मते अल्प उत्पन्नामुळे कौटुंबिक गरजा पूर्ण होत नाहीत.

ब) स्पष्टीकरण :-

वरील सारणीवरून अल्प उत्पन्नामुळे किमान कौटुंबिक गरजा पूर्ण होत नाहीत अशा मतांचे कामगार जास्त प्रमाणात (८६·६७ टक्के) कामगार शिक्षण वर्गात सहभागी झालेले होते· उत्पन्न अल्प असले तरीही कामगार आपल्या व्यवसायाविषयी अधिक माहिती मिळविण्यासाठी उत्सुक असतात· त्यामुळे आपल्या अल्प उत्पन्नाविषयीचे स्पष्टीकरण मिळेल, असे त्यांना वाटत असावे·

सारणी क्रमांक १४ :-

कामगारांच्या मुलांची शैक्षणिक माहिती दर्शविणारी सारणी.

| मुलांचे शिक्षण | कामगारांची संख्या | प्रमाण |
| --- | --- | --- |
| १) सर्वांना | १०३ | ८५.८३ |
| २) कांहीना | - | - |
| ३) कोणालाही नाही | - | - |
| ४) लहान मुले (शिक्षण योग्य वयापेक्षा) | १७ | १४.१७ |
| | १२० | १००.०० |

ब) पृथःकरण :-

१) ८५.८३ टक्के कामगारांनी आपल्या सर्व मुलांना शिक्षण दिले आहे.

२) कोणालाही शिक्षण न देणारा कामगार आढळला नाही.

३) १४.१७ टक्के कामगारांची मुले शिक्षण योग्य वयापेक्षा लहान व कांहीना मुले नाहीत.

ब) स्पष्टीकरण :-

वरील सारणीवरुन कामगार शिक्षण वर्गात आपल्या सर्व मुलांना शिक्षण देणा-या कामगारांचे जास्त प्रमाण (८५.८३ टक्के) आहे. याचे कारण असे असावे की, कामगारांना शिक्षणाचे महत्व पटलेले आहे. शिक्षणाशिवाय व्यक्ती विकास नाही. आपली मुले आपल्यासारखी अल्पशिक्षित राहू नये या भावनेनेही सर्वांना शिक्षण दिले असावे.

सारणी क्रमांक १५ :-

कामगारांना ज्या पाहुण्या व्याख्यातांची व्याख्याने आवडली आहेत त्याची माहिती दर्शविणारी सारणी.

| व्याख्याता | कामगारांची संख्या | प्रमाण |
|---|---|---|
| १) वकील | ०१ | ००.८३ |
| २) डॉक्टर | ०१ | ००.८३ |
| ३) व्यवस्थापक | ११ | ०९.१७ |
| ४) प्राध्यापक | ३८ | ३१.६७ |
| ५) कामगार कार्यकर्ते | ५२ | ४३.३४ |
| ६) संबंधीत सरकारी अधिकारी | १३ | १०.८३ |
| ७) कामगार अधिकारी | ०४ | ०३.३३ |
| | १२० | १००.०० |

अ) पृथ:करण :-

१) ०.८३ टक्के कामगारांना पाहुण्या व्याख्यात्यांपैकी वकीलांचे व्याख्यान आवडले.

२) ०.८३ टक्के कामगारांना पाहुण्या व्याख्यात्यांपैकी डॉक्टरांचे व्याख्यान आवडले.

३) ९.१७ टक्के कामगारांना पाहुण्या व्याख्यात्यांपैकी व्यवस्थापकाचे व्याख्यान आवडले.

४) ३१·६७ टक्के कामगारांना पाहुण्या व्याख्यात्यांपैकी प्राध्यापकांचे व्याख्यान आवडले·

५) ४३·३४ टक्के कामगारांना पाहुण्या व्याख्यात्यांपैकी कामगार कार्यकर्त्यांचे व्याख्यान आवडले·

६) १०·८३ टक्के कामगारांना पाहुण्या व्याख्यात्यांपैकी संबंधीत सरकारी अधिकारी (शिक्षणाधिकारी, कामगार शिक्षण योजना) यांचे व्याख्यान आवडले·

७) ३·३३ टक्के कामगारांना पाहुण्या व्याख्यात्यांपैकी कामगार अधिकारी यांचे व्याख्यान आवडले·


ब) स्पष्टीकरण :-

वरील सारणीवरून कामगार शिक्षण वर्गात आलेल्या पाहुण्या व्याख्यात्यांपैकी ( Guest Lecturer ) कामगार कार्यकर्त्यांचे व्याख्यान जास्त प्रमाणात (४३·३४ टक्के) आवडले असावे· याचे कारण असे की, कामगार कार्यकर्ता हा एक कामगारच असल्यामुळे तो आपल्यातला एक म्हणून जवळीकता असते व कामगार कार्यकर्ते कामगारांच्या क्षमते प्रमाणे व्याख्यान देत असावेत·

तसेच त्या खालोखाल प्राध्यापकांचे व्याख्यान आवडणारांचे प्रमाणही अतिशय समाधानकारक आहे· कारण प्राध्यापकांचे व्याख्यान देण्याचे कौशल्य, एखादा विषय समजावून सांगण्याचे कसब इत्यादींमुळे प्राध्यापकांचेही व्याख्यान आवडले असावे·

आलेख क्रमांक - ४

कामगारांना ज्या पाहुण्या कारखान्यांमधील कारखाने आवडली आहेत त्यांची माहिती दाखविणारा आलेख



सारणी क्रमांक १६ :-

मिल व कामगारांचे घर यामधील अंतर दर्शविणारी सारणी•

| अंतर | कामगारांची संख्या | प्रमाण |
|---|---|---|
| १) मिलपासून ० ते १ कि•मी• | ६६ | ५५•०० |
| १ ते ३ कि•मी• | ३७ | ३०•८३ |
| ३ ते ५ कि•मी• | ०५ | ०४•१७ |
| ५ कि•मी• पेक्षा जास्त | १२ | १०•०० |
| | १२० | १००•०० |

अ) पृथ:करण :-

१) ५५ टक्के कामगारांचे घर हे मिलपासून १ कि•मी• च्या आत आहे•

२) ३०•८३ टक्के कामगारांचे घर हे मिलपासून १ ते ३ कि•मी• च्या दरम्यान आहे•

३) ४•१७ टक्के कामगारांचे घर हे मिलपासून ३ ते ५ कि•मी• च्या दरम्यान आहे•

४) १० टक्के कामगारांचे घर हे मिलपासून ५ कि•मी• पेक्षा जास्त अंतरावर आहे•

ब) स्पष्टीकरण :-

वरील सारणीवरुन कामगार शिक्षण वर्गात मिलपासून ३ कि.मी.च्या आत अंतर असलेल्या कामगारांचे जास्त प्रमाण (८५.८३ टक्के) आहे. याचे कारण असे असावे की, शिक्षण वर्ग हे मिल सुटल्यानंतर म्हणजे सायंकाळी ४ ते ५ व दुसरी पाळी सुरु होण्यापूर्वी दुपारी २ ते ३ असे होतात. त्यामुळे जवळपास राहणाऱ्या कामगारांना कामगार शिक्षणवर्गात भाग घेणे सोयीचे वाटत असावे.

सारणी क्रमांक १७ :-

कामगारांचे घर मिलपासून जास्त अंतरावर असेल तर वापरण्यात येणा-या वाहनांचे प्रमाण दर्शविणारी सारणी.

| वाहने | कामगारांची संख्या | प्रमाण |
|---|---|---|
| चालत (घर दूर) | ०६ | ५.०० |
| सायकल | ६९ | ५७.५० |
| मोटार सायकल | - | - |
| बस | - | - |
| रेल्वे | - | - |
| चालत (घर अगदी जवळ) | ४५ | ३७.५० |
| | १२० | १००.०० |

अ) पृथ:करण :-

१) ज्या कामगारांचे घर दूर होते अशापैकी ५ टक्के कामगार चालत येत होते.

२) ज्या कामगारांचे घर दूर होते अशा पैकी ५७.५ टक्के कामगार सायकलवर येत होते.

३) प्रवासाचे साधन म्हणून मोटार, सायकल, बस व रेल्वे यांचा वापर कोणीही करत नव्हते.

४) ३७·५ टक्के कामगारांचे घर मिलच्या समोर म्हणजे १/४ कि·मी· पेक्षा कमी अंतरावर होते·

ब) स्पष्टीकरण :-

वरील सारणी वरुन कामगार शिक्षण वर्गात दूर अंतरावरुन येणारे कामगार सायकलचा जास्त प्रमाणात (५७·५ टक्के) वापर करतात हे दिसून येते· याचे कारण असे असावे की, सर्व सामान्यांना परवडणारी सायकल हे उत्तम प्रवासाचे साधन आहे· इतर वाहने कामगारांना परवडत नसावीत·

सारणी क्रमांक १८ :-

शिक्षण पूर्ण केल्यानंतर बदलीविषयक माहिती दर्शविणारी सारणी

| कोणत्या बाबतीत बदल झाला | कामगारांची संख्या | प्रमाण |
|---|---|---|
| १) साक्षरता | ०७ | ०५·८३ |
| २) अस्पृश्यता निवारण्याची जाणीव | ०१ | ००·८३ |
| ३) अंधश्रध्दा निर्मूलन | ०३ | ०२·५० |
| ४) सवत:च्या कामामध्ये निपुणता | १०५ | ८७·५० |
| ५) कुटुंबनियोजनाबद्दल आस्था | १४ | ११·६६ |
| ६) बचतीची सवय | ११ | ०९·१६ |

अ) पृथ:करण :-

१) ५·८३ टक्के कामगारांमध्ये कामगार शिक्षण वर्ग पूर्ण केल्यानंतर साक्षरतेमध्ये बदल झाला·

२) ०·८३ टक्के कामगारांमध्ये कामगार शिक्षण वर्ग पूर्ण केल्यानंतर अस्पृश्यता निवारणाची जाणीव झाली·

३) २·५ टक्के कामगारांमध्ये कामगार शिक्षण वर्ग पूर्ण केल्यानंतर अंधश्रध्दा निर्मूलनाची जाणीव झाली·

४) ८७•५ टक्के कामगारांमध्ये कामगार शिक्षण पूर्ण केल्यानंतर स्वत:च्या कामामध्ये निपुणता आली•

५) ११•६६ टक्के कामगारांमध्ये कामगार शिक्षण वर्ग पूर्ण केल्यानंतर कुटुंब नियोजनाबद्दल आस्था निर्माण झाली•

६) ९•१६ टक्के कामगारांमध्ये कामगार शिक्षण वर्ग पूर्ण केल्यानंतर बचतीची सवय लागली•

ब) <u>स्पष्टीकरण</u> :-

वरील सारणीवरुन असे दिसून येते की, कामगार शिक्षण वर्ग पूर्ण केल्यानंतर स्वत:च्या कामामध्ये निपुणता असलेल्या कामगारांचे जास्त प्रमाण (८७•५ टक्के) आहे• याचे कारण असे असावे की, कामगार शिक्षण वर्गात उत्पादकता वाढण्याच्या दृष्टीने माहिती सांगितली जाते• तसेच औद्योगिक संबंधावर भर दिला जात असावा• तसेच कामामध्ये कौशाल्य प्राप्त करण्यावर भर दिला जात असावा•

सारणी क्रमांक १९ :-

मालक व कामगार यांच्यातील औद्योगिक संबंधाविषयीचे मार्गदर्शन कामगार शिक्षण वर्गात कोणत्या प्रकारे केले याची माहिती दर्शविणारी सारणी.

| कोणत्या प्रकारे मार्गदर्शन | कामगारांची संख्या | प्रमाण |
|---|---|---|
| १) प्रामाणिकपणाने काम | ४३ | ३५.८३ |
| २) कुशल काम | २० | १६.६६ |
| ३) उत्पादन वाढवण्यास सहाय्य | ४२ | ३५.०० |
| ४) संप टाळेबंदी सारखे प्रकार टाळणे | २७ | २२.५० |

अ) पृथःकरण :-

१) ३५.८३ टक्के कामगारांच्या मते कामगार शिक्षण वर्गात मालक व कामगार यांच्यातील औद्योगिक संबंध सुधारण्यासाठी प्रामाणिकपणाने काम करणे या विषयी मार्गदर्शन केले.

२) १६.६६ टक्के कामगारांच्या मते कामगार शिक्षण वर्गात मालक व कामगार यांच्यातील औद्योगिक संबंध सुधारण्यासाठी कुशल काम करणे याविषयी मार्गदर्शन केले.

३) ३५ टक्के कामगारांच्या मते कामगार शिक्षण वर्गात मालक व कामगार यांच्यातील औद्योगिक संबंध सुधारण्यासाठी उत्पादन वाढवण्यास सहाय्य करणे या विषयी मार्गदर्शन केले.

४) २२·५ टक्के कामगारांच्या मते कामगार शिक्षण वर्गात मालक व कामगार यांच्यातील औद्योगिक संबंध सुधारण्यासाठी संप, टाळेबंदी यासारखे प्रकार टाळणे याविषयी मार्गदर्शन केले·

ब) स्पष्टीकरण :-

वरील सारणीवरून कामगार शिक्षण वर्गात प्रामाणिकपणाने काम व उत्पादन वाढवणेस सहाय्य या विषयी जास्त प्रमाणात मार्गदर्शन केले· याचे कारण असे असावे की, कामगार शिक्षण योजना सध्या तरी व्यवस्थापन चालवते· व्यवस्थापनास फायदेशीर अशा बाबीवरच जास्त मार्गदर्शन केले जाणे, स्वाभाविक आहे·

सारणी क्रमांक २० :-

कामगारांच्या व्यवस्थापनात सहभाग कशासाठी असावा हे मत प्रदर्शन करणारी सारणी.

| कारणे | कामगारांची संख्या | प्रमाण |
|---|---|---|
| १) पगार वाढवून मिळणे | १२ | १०.०० |
| २) कामगारांच्या समस्या व्यवस्थापनास समजणे | ३५ | २९.१७ |
| ३) कामगारांच्या बाजूने निर्णय घेणे | २८ | २३.३३ |
| ४) संप टाळेबंदी टाळणे | ०७ | ०५.८३ |
| ५) कामाची चांगली परिस्थिती निर्माण करून देणे | ३८ | ३१.६७ |
| | १२० | १००.०० |

अ) पृथ:करण :-

१) १० टक्के कामगारांच्या मते कामगारांचा व्यवस्थापनात सहभाग हा पगार वाढवून मिळणेसाठी असावा असे वाटते.

२) २९.१७ टक्के कामगारांच्या मते कामगारांचा व्यवस्थापनात सहभाग हा कामगारांच्या समस्या व्यवस्थापनास समजण्यासाठी असावा असे वाटते.

३) २३.३३ टक्के कामगारांच्या मते कामगारांचा व्यवस्थापनात सहभाग हा कामगारांच्या बाजूने निर्णय घेणेसाठी असावा असे वाटते.

४) ५·८३ टक्के कामगारांच्या मते कामगारांचा व्यवस्थापनात सहभाग हा संप, टाळेबंदी सारखे प्रकार टाळण्यासाठी असावा असे वाटते·

५) ३१·६७ टक्के कामगारांच्या मते कामगारांचा व्यवस्थापनात सहभाग हा कामाची चांगली परिस्थिती निर्माण करून देणेसाठी असावा असे वाटते·

ब) <u>स्पष्टीकरण</u> :-

वरील सारणीच्या अनुषंगाने हे स्पष्ट होते की, सर्व कामगारांच्या मते कामगारांचा व्यवस्थापनात सहभाग असावा व बहुतेकांच्या मते कामगारांचा व्यवस्थापनात सहभाग असल्याने कामगारांच्या समस्या व्यवस्थापकांना योग्य प्रकारे समजावून दिल्या जावू शकतात· तसेच कामगारांच्या कामाचि परिस्थिती योग्य राहू शकते·

सारणी क्रमांक २१ :-

कारखान्याची उत्पादकता वाढवण्याच्या दृष्टीने कामगार शिक्षण वर्गामध्ये केलेल्या मार्गदर्शनाविषयी माहिती दर्शविणारी सारणी.

| उत्पादकता वाढवणेविषयी कोणत्या बाबतीत मार्गदर्शन केले. | कामगारांची संख्या | प्रमाण |
|---|---|---|
| १) कामगारांची भूमिका | २८ | २३.३३ |
| २) व्यवस्थापनाची भूमिका | ०३ | ०२.५० |
| ३) कामगार संघटनेची भूमिका | ०८ | ०६.६७ |
| ४) कामाची परीस्थती | ८१ | ६७.५० |
| | १२० | १००.०० |

अ) पृथःकरण :-

१) २३.३३ टक्के कामगारांच्या मतानुसार कामगार शिक्षण वर्गामध्ये कारखान्याची उत्पादकता वाढवणेसाठी कामगारांची भूमिका कशी असावी या विषयी मार्गदर्शन केले.

२) २.५ टक्के कामगारांच्या मतानुसार कामगार शिक्षण वर्गामध्ये कारखान्याची उत्पादकता वाढवणेसाठी व्यवस्थापनाची भूमिका कशी असावी या विषयी मार्ग-दर्शन केले.

३) ६·६७ टक्के कामगारांच्या मतानुसार कामगार शिक्षण वर्गामध्ये कारखान्याची उत्पादकात वाढवणेसाठी कामगार संघटनेची भूमिका कशी असावी या विषयी मार्गदर्शन केले·

४) ६७·५ टक्के कामगारांच्या मतानुसार कामगार शिक्षण वर्गामध्ये कारखान्याची उत्पादकता वाढवणेसाठी कामाची परिस्थिती कशी असावी या विषयी मार्गदर्शन केले·

ब) स्पष्टीकरण :-

वरील सारणीवरुन असे दिसून येते की, कामगार शिक्षण वर्गामध्ये कारखान्याची उत्पादकता वाढविण्याच्या दृष्टीने कामाची परिस्थिती कशी असावी याविषयी जास्त प्रमाणात (६७·५ टक्के) मार्ग-दर्शन केले· याचे कारण असे असावे की, मिलमध्ये स्वच्छता, कामाच्या ठिकाणी शांतता, मिलमधील यंत्राचा आवाज जास्त प्रमाणात येवू नये याविषयी काळजी घेणे, उन्हाळयात मिलमध्ये थंड हवेसाठी पंखे इत्यादिची सोय करुन कामाची परिस्थिती चांगली केली म्हणजे उत्पादनात वाढ होईल·

वरील दृष्टीकोनाचा विचार करता कामगार शिक्षण योजना ही कारखान्याच्या व व्यवस्थापनाच्या दृष्टीनेसुध्दा हिताची आहे हे स्पष्ट होते·

सारणी क्रमांक २२ :-

कामगार शिक्षण वर्गात उत्पादकता वाढविण्याच्या कोणत्या पध्दती विषयी माहिती देण्यात आली याविषयी माहिती दर्शवणारी सारणी•

| पध्दती | कामगारांची संख्या | प्रमाण |
|---|---|---|
| १) कार्यमुल्यांकन | ०४ | ३•३३ |
| २) गुणवत्ता | ०७ | ५•८३ |
| ३) प्रलोभने | ०५ | ४•१७ |
| ४) मर्यादित कामाचे तास | १५ | १२•५० |
| ५) मार्गदर्शन केले नाही | ८९ | ७४•१७ |
| | १२० | १००•०० |

अ) पृथ:करण :-

१) ३•३३ टक्के कामगारांच्या मतानुसार उत्पादकता वाढविण्याच्या दृष्टीने कार्यमुल्यांकन या पध्दती विषयी कामगार शिक्षण वर्गात माहिती सांगितली•

२) ५•८३ टक्के कामगारांच्या मतानुसार उत्पादकता वाढविण्याच्या दृष्टीने गुणवत्ता या पध्दती विषयी कामगार शिक्षण वर्गात माहिती सांगितली•

३) ४·१७ टक्के कामगारांच्या मतानुसार उत्पादकता वाढविण्याच्या दृष्टीने प्रलोभने या पध्दतीविषयी कामगार शिक्षण वर्गात माहिती सांगितली·

४) १२·५ टक्के कामगारांच्या मतानुसार उत्पादकता वाढविण्याच्या दृष्टीने मर्यादित कामाचे तास या पध्दतीविषयी कामगार शिक्षण वर्गात माहिती सांगितली·

५) ७४·१७ टक्के कामगारांच्या मतानुसार उत्पादकता वाढविण्याच्या दृष्टीने कामगार शिक्षण वर्गात कोणत्याही नविन पध्दती विषयी मार्गदर्शन केले नाही·


ब) स्पष्टीकरण :-

वरील सारणीवरुन असे दिसून येते की, कामगार शिक्षण वर्गात कोणत्याही नविन पध्दतीविषयी मार्गदर्शन केले नाही अशा मताचे जास्त प्रमाण आहे·

आलेख क्रमांक – ५

कामगार शिक्षण वर्गात उत्पादकता वाढविण्याच्या कोणत्या पद्धतीविषयी माहिती देण्यात आली याविषयी माहिती दाखविणारा आलेख. (१ से.मी. = १०% कामगार)

प्रमाण – १ से.मी. = १० % कामगार




अ – कार्य मूल्यांकन

ब – गुणवत्ता

क – प्रलोभने

ड – [illegible] कामांचे [illegible]

इ – मार्गदर्शन केले नाही.

सारणी क्रमांक २३ :-

कामगार ज्या संघटनेचे सभासद आहेत त्याची माहिती दर्शवणारी सारणी.

| संघटना | कामगारांची संख्या | प्रमाण |
|---|---|---|
| १) आयटक | - | - |
| २) इंटक | - | - |
| ३) भारतीय मजदूर संघ | - | - |
| ४) राष्ट्रीय गिरणी कामगार संघ | ११८ | ९८.३४ |
| ५) सभासद नसलेले | ००२ | १.६६ |
| | १२० | १००.०० |

अ) पृथःकरण :-

१) ९८.३४ टक्के कामगार हे राष्ट्रीय गिरणी संघाचे सभासद आहेत.

२) १.६६ टक्के कामगार हे कोणत्याही संघटनेचे सभासद नाहीत.

ब) स्पष्टीकरण :-

वरील सारणी वरुन कामगार शिक्षण वर्गात इंटक प्रणीत राष्ट्रीय गिरणी कामगार संघाचे सभासद जास्त प्रमाणात (९८·३४ टक्के) होते असे दिसून येते. अशा स्थितीचे कारण असे असावे की, मिल मध्ये दोन कामगार संघटना आहेत त्यातील राष्ट्रीय गिरणी कामगार संघ ही संघटना अधिकृत म्हणजे मान्यता प्राप्त व गिरणी कामगार युनियन ही संघटना अनधिकृत म्हणजे मान्यता प्राप्त नसलेली आहेत. साहजिकच अधिकृत संघटनेकडे सभासदांची संख्या जास्त राहणार म्हणूनच कामगार शिक्षण वर्गात राष्ट्रीय गिरणी कामगार संघाचे सभासद जास्त असावेत.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

सारणी क्रमांक २४ :-

कामगार संघटनेने आयोजित केलेल्या सभांचे प्रमाण दर्शवणारी सारणी.

| सभा | कामगारांची संख्या | प्रमाण |
|---|---|---|
| १) कांही वेळा | ०४ | ०३.३३ |
| २) गरजेप्रमाणे | १०४ | ८६.६८ |
| ३) वारंवार | ०४ | ०३.३३ |
| ४) फक्त संपकाळी | - | - |
| ५) सभा माहित होत नाहीत | ०६ | ०५.०० |
| ६) सभासद नसलेले | ०२ | ०१.६६ |
| | १२० | १००.०० |

अ) पृथ:करण :-

१) ३.३३ टक्के कामगारांच्या मते कामगार संघटनेच्या कांही वेळा सभा होतात.

२) ८६.६८ टक्के कामगारांच्या मते कामगार संघटनेच्या गरजेप्रमाणे सभा होतात.

३) ३.३३ टक्के कामगारांच्या मते कामगार संघटनेच्या वारंवार सभा होतात.

४) ५ टक्के कामगारांच्या मते कामगार संघटनेच्या सभा केंव्हा होतात हे माहिती होत नाही.

५) १•६६ टक्के कामगार हे कोणत्याही संघटनेचे सभासद नसलेमुळे सभेविषयी माहिती नाही•

ब) स्पष्टीकरण :-

वरील सारणीवरुन कामगार संघटनेच्या गरजे प्रमाणे सभा होतात अशा मतांचे कामगार शिक्षण वर्गात जास्त प्रमाणात (८६•६८ टक्के) होतात हे दिसून येते•

याचे कारण असे असावे की, ज्यावेळी संघटनेस सभेची गरज भासेल त्यावेळी सभा आयोजित करत असावेत• साधारणपणे वर्षातून एक किंवा दोन सभा घेण्याची गरज असते•

सारणी क्रमांक २५ :-

कामगार संघटनेने आयोजित केलेल्या सभेस कामगारांचे हजर राहण्याचे प्रमाण दर्शविणारी सारणी.

| हजर सभा | कामगारांची संख्या | प्रमाण |
|---|---|---|
| १) सर्व सभांना | १३ | १०.८३ |
| २) कांहीसभांना | ७० | ५८.३४ |
| ३) एकाही नाही | २९ | २४.१७ |
| ४) सभा माहिती होत नाहीत | ०६ | ०५.०० |
| ५) सभासद नसलेले | ०२ | ०१.६६ |
| | १२० | १००.०० |

अ) पृथ:करण :-

१) १०.८३ टक्के कामगार संघटनेच्या सर्व सभांना हजर राहतात.

२) ५८.३४ टक्के कामगार संघटनेच्या कांही सभांना हजर राहतात.

३) २४.१७ टक्के कामगार संघटनेच्या एकाही सभेस हजर राहत नाहीत.

४) ५ टक्के कामगारांना सभा केंव्हा होते हे माहित होत नाही त्यामुळे सभेस हजर राहत नाहीत.

५) १.६६ टक्के कामगार संघटनेचे सभासद नाहीत त्यामुळे तेही सभेस हजर राहत नाहीत.


ब) स्पष्टीकरण :-

वरील सारणीवरुन कामगार शिक्षण वर्गात कामगार संघटनेने आयोजित केलेल्या सभांपैकी कांही सभांना हजर राहण्याचे जास्त प्रमाण (५८•३४ टक्के) आहे• हे प्रमाण समाधानकारक नाही कारण कामगार संघटना या कामगारांसाठीच आहेत• कामगारांचे हितसंबंध जोपासण्यासाठीच कामगार संघटना प्रयत्नशील असतात• महत्वाचे निर्णय घेण्यासाठी व त्या निर्णयासाठी कामगारांचा पाठिंबा मिळण्यासाठी कामगार संघटना सभा आयोजित करतात• परंतु कामगार सर्व सभांना हजर न राहता कांही सभांना हजर राहतात•

आलेख क्रमांक - ६

कामगार संघटनेने आयोजित केलेल्या सभेस कामगारांच्या हजर राहण्याचे प्रमाण दाखवणारा आलेख.

प्रमाण १ से.मी. = १० कामगार




अ - सर्व सभा

ब - काही सभा

क - एकही नाही

ड - सभा माहिती होत नाहीत

इ - सभासद नसलेले

सारणी क्रमांक २६ :-

ग्रामीण कामगारासह सर्व विभागातील कामगार सामर्थ्यवान बनण्यासाठी ज्या बाबीवर कामगार शिक्षण वर्गात मार्गदर्शन केले आहे त्या विषयी माहिती दर्शविणारी सारणी•

| सामर्थ्यवान बनण्याविषयी बाबी | कामगारांची संख्या | प्रमाण |
|---|---|---|
| १) देशभक्ती | २१ | १७•५० |
| २) राष्ट्रीय एकात्मता | ८६ | ७१•६७ |
| ३) एकता | ०२ | ०१•६६ |
| ४) धर्मनिरपेक्षता | १५ | १२•५० |
| ५) स्नेहभाव | ०५ | ०४•१७ |
| ६) जातीय ऐक्य | ०२ | ०१•६६ |

अ) पृथःकरण :-

१) १७•५ टक्के कामगारांच्या मते कामगार शिक्षण वर्गात ग्रामिण कामगारासह सर्व विभागातील कामगार सामर्थ्यवान बनण्यासाठी देशभक्ती विषयी मार्गदर्शन केले•

२) ७१•६७ टक्के कामगारांच्या मते कामगार शिक्षण वर्गात ग्रामीण कामगारासह सर्व विभागातील कामगार सामर्थ्यवान बनण्यासाठी राष्ट्रीय एकात्मता या विषयी मार्गदर्शन केले•

३) १·६६ टक्के कामगारांच्या मते कामगार शिक्षण वर्गात ग्रामीण कामगारासह सर्व विभागातील कामगार सामर्थ्यवान बनण्यासाठी एकते विषयी मार्गदर्शन केले·

४) १२·५ टक्के कामगारांच्या मते कामगार शिक्षण वर्गात ग्रामीण कामगारासह सर्व विभागातील कामगार सामर्थ्यवान बनण्यासाठी धर्मनिरपेक्षतेविषयी मार्गदर्शन केले·

५) ४·१७ टक्के कामगारांच्या मते कामगार शिक्षण वर्गात ग्रामीण कामगारासह सर्व विभागातील कामगार सामर्थ्यवान बनण्यासाठी स्नेहभाव या विषयी मार्गदर्शन केले·

६) १·६६ टक्के कामगारांच्या मते कामगार शिक्षण वर्गात ग्रामीण कामगारासह सर्व विभागातील कामगार सामर्थ्यवान बनण्यासाठी जातीय ऐक्य या विषयी मार्गदर्शन केले·


ब) स्पष्टीकरण :-

वरील सारणीवरून कामगार शिक्षण वर्गात ग्रामीण कामगारासह सर्व विभागातील कामगार सामर्थ्यवान बनण्यासाठी राष्ट्रीय एकात्मतेवर जास्त प्रमाणात (७१·६७ टक्के) मार्गदर्शन केले आहे· याचे कारण असे असावे की, स्वातंत्र्यानंतर भारतात ठिकठिकाणी जातीय, वांशिक, धार्मिक, भाषिक दंगली निर्माण होवून तणाव निर्माण होतो· भारतामध्ये अनेक धर्मांचे, वंशाचे, जातीचे लोक राहतात· त्यांच्यामध्ये कोणत्याना कोणत्या कारणासाठी सतत वैमनस्य धुमसत असते· आपल्याला विविधतेतून राष्ट्रीय एकात्मता साध्य करावयाची आहे· म्हणूनच कामगार शिक्षण वर्गात राष्ट्रीय एकात्मतेवर भर दिला गेला असावा·

## आलेख क्रमांक – ७

ग्रामीण कामगारासह सर्व विभागातील कामगार सामर्थ्यवान बनण्यासाठी ज्या बाबींवर कामगार शिक्षण वर्गात मार्गदर्शन केले आहे त्याविषयी माहिती दाखविणारा आलेख.

प्रमाण - १ से.मी. = १० टक्के कामगार




अ - देशभक्ती

ब - राष्ट्रीय एकात्मता

क - एकता

ड - धर्मनिरपेक्षता

इ - स्नेहभाव

ई - भावनिक ऐक्य.

सारणी क्रमांक २७ :-

कामगार शिक्षण योजना कामगार संघटना चालवेल की नाही या विषयी कामगारांचे मत दर्शविणारी सारणी.

| कामगार संघटना ही योजना चालवू शकेल काय ? | कामगारांची संख्या | प्रमाण |
|---|---|---|
| १) होय | ५३ | ४४.१७ |
| २) नाही | ४९ | ४०.८३ |
| ३) सांगता येत नाही | १८ | १५.०० |
| | १२० | १००.०० |

अ) पृथःकरण :-

१) ४४.१७ टक्के कामगारांच्या मतानुसार कामगार शिक्षण योजना कामगार संघटना समर्थपणे चालवू शकेल.

२) ४०.८३ टक्के कामगारांच्या मतानुसार कामगार शिक्षण योजना कामगार संघटना चालवू शकणार नाही.

३) १५ टक्के कामगारांच्या मतानुसार कामगार शिक्षण योजना कामगार संघटना चालवेल किंवा नाही या विषयी कांही सांगता येत नाही.

ब) स्पष्टीकरण :-

वरील सारणीवरून कामगार शिक्षण योजना कामगार संघटना समर्थपणे चालवू शकेल असे जास्त प्रमाणात (४०•१७ टक्के) कामगारांना वाटते• याचे कारण असे असावे की, कामगार शिक्षण योजना ही कामगारांसाठी आहे• कामगार संघटना ही कामगारांची संघटना आहे• कामगारासाठीच्या योजना व्यवस्थापन यशस्वीपणे राबवू इच्छित नाही• व्यवस्थापनास जे फायदेशीर आहे तेवढयाच योजना राबवतात• म्हणून कामगारांसाठीची योजना कामगार संघटना चालवेल असा विश्वास जास्त कामगारांना वाटतो• संशोधकाने यावर कामगार संघटनेस सर्व खर्च करावा लागतो व तो खर्च कामगार संघटनेस झेपणार नाही असे समजावून सांगीतले असता देखील बहुसंख्या कामगारांनी वरील मत व्यक्त केले•

सारणी क्रमांक २८ :-

कामगार शिक्षण वर्गामध्ये राष्ट्रीय जबाबदारी वाढवण्यासाठी ज्या विषयावर भर देण्यात आलेला आहे त्या विषयी माहिती दर्शविणारी सारणी•

| जबाबदारी | कामगारांची संख्या | प्रमाण |
|---|---|---|
| १) वृक्षरोपण | १३ | १०•८३ |
| २) रक्तदान | ११३ | ९४•१६ |
| ३) नेत्रदान | ८० | ६६•६७ |
| ४) महत्व सांगीतले नाही | ०६ | ०५•०० |

अ) पृथःकरण :-

१) १०•८३ टक्के कामगारांच्या मते वृक्षरोपण या विषयावर कामगारांची राष्ट्रीय जबाबदारी म्हणून कामगार शिक्षण वर्गात भर देण्यात आला•

२) ९४•१६ टक्के कामगारांच्या मते रक्तदान या विषयावर कामगारांची एक राष्ट्रीय जबाबदारी म्हणून कामगार शिक्षण वर्गात भर देण्यात आला•

३) ६६•६७ टक्के कामगारांच्या मते नेत्रदान या विषयावर कामगारांची एक राष्ट्रीय जबाबदारी म्हणून कामगार शिक्षण वर्गात भर देण्यात आला•

४) ५ टक्के कामगारांच्या मते राष्ट्रीय जबाबदारी म्हणून वृक्षरोपण, रक्तदान, नेत्रदान यापैकी कोणत्याही विषयावर मार्गदर्शन केले नाही•

ब) स्पष्टीकरण :-

वरील सारणीवरुन असे दिसून येते की, कामगारांची एक राष्ट्रीय जबाबदारी म्हणून रक्तदानावर जास्त प्रमाणात (९४•१६ टक्के) भर दिलेला आहे• याचे कारण असे असावे की, रक्तदान ही आजच्या काळाची गरज बनली आहे• रक्ताची मागणी जास्त प्रमाणात आहे तर रक्तदान करणा-यांचे प्रमाण अतिशय कमी आहे• रक्तदानाविषयी अनेक गैरसमजही आहेत त्यामुळे रक्तदानाचे महत्व जास्त प्रमाणात पटवून दिले असावे•

सारणी क्रमांक २९ :-

कामगारांचे रक्तदान करण्याचे प्रमाण दर्शविणारी सारणी.

| रक्तदान करण्याचे प्रमाण | कामगारांची संख्या | प्रमाण |
|---|---|---|
| १) एकवेळ | १५ | १२.५० |
| २) एकापेक्षा अधिक वेळा | १४ | ११.६६ |
| ३) अनेक वेळा | १२ | १०.०० |
| ४) एकवेळ ही नाही | ७९ | ६५.८४ |
| | १२० | १००.०० |

अ) पृथःकरण :-

१) १२.५ टक्के कामगारांनी राष्ट्रीय जबाबदारीचे कर्तव्य म्हणून एक वेळा रक्तदान केले.

२) ११.६६ टक्के कामगारांनी राष्ट्रीय जबाबदारीचे कर्तव्य म्हणून ऐकापेक्षा अधिक वेळा परंतु पाच वेळा पर्यंत रक्तदान केले.

३) १० टक्के कामगारांनी राष्ट्रीय जबाबदारीचे कर्तव्य म्हणून अनेकवेळा (पाच वेळा पेक्षा अधिक) रक्तदान केले.

४) ६५.८४ टक्के कामगारांनी एक वेळाही रक्तदान केले नाही.

ब) स्पष्टीकरण :-

वरील सारणीवरून राष्ट्रीय जबाबदारी म्हणून रक्तदान करणा-या पेक्षा रक्तदान न करणा-याचे जास्त प्रमाण (६५•८४ टक्के) आहे असे दिसून येते•

याचे कारण असे असावे की, मिलमधील काम अतिशय श्रमाचे आहे• रक्तदान केल्यामुळे अशक्तपणा येवून काम करता येणार नाही• एड्स सारखा महाभयानक रोग होईल• इत्यादी सारख्या गैरसमजूतीमुळे रक्तदान केले जात नसावे•

सारणी क्रमांक ३० :-

कामगार शिक्षण योजनेत राष्ट्रीय समस्या विषयी मार्गदर्शन केले त्यासंबंधी माहिती दर्शविणारी सारणी.

| राष्ट्रीय समस्या | कामगारांची संख्या | प्रमाण |
|---|---|---|
| १) राष्ट्रीय एकात्मता | ३१ | २५•८३ |
| २) हुंडाबळी | २५ | २०•८३ |
| ३) बेकारी | १४ | ११•६६ |
| ४) मद्यपान | ७६ | ६३•३३ |
| ५) गुन्हेगारी | १९ | १५•८३ |
| ६) मार्गदर्शन केले नाही. | ०१ | ००•८३ |

अ) पृथःकरण :-

१) २५•८३ टक्के कामगारांच्या मते कामगार शिक्षण वर्गात राष्ट्रीय एकात्मता या समस्येवर मार्गदर्शन केले.

२) २०•८३ टक्के कामगारांच्या मते कामगार शिक्षण वर्गात हुंडाबळी या समस्येवर मार्गदर्शन केले.

३) ११•६६ टक्के कामगारांच्या मते कामगार शिक्षण वर्गात बेकारी या समस्येवर मार्गदर्शन केले.

४) ६३·३३ टक्के कामगारांच्या मते कामगार शिक्षक वर्गात मद्यपान या समस्येव मार्गदर्शन केले·

५) १५·८३ टक्के कामगारांच्या मते कामगार शिक्षण वर्गात गुन्हेगारी या समस्येवर मार्गदर्शन केले·

६) ०·८३ टक्के कामगारांच्या मते कामगार शिक्षण वर्गात कोणत्याच समस्येविषयी मार्गदर्शन केले नाही·

ब) <u>स्पष्टीकरण</u> :-

वरील सारणी वरून कामगार शिक्षण वर्गात मद्यपान या राष्ट्रीय समस्येवर जास्त प्रमाणात (६३·३३ टक्के) मार्गदर्शन केलेले आहे असे दिसून येते·

याचे कारण असे असावे की, कामगारांमध्ये व्यसनांचे जास्त प्रमाण आहे· त्यात मद्यपानाचे व्यसनाचे प्रमाण जास्त आहे· याचे कारण मिलमधील जास्त श्रमाचे काम केल्यानंतर शारिरीक थकवा येतो· मद्यपान केल्यामुळे त्याची सर्व दु:खे विसरली जातात व त्यास एक प्रकारचा विरंगुळा वाटतो· मद्यपानाने आरोग्यावर अनिष्ट परिणाम होतो· मद्यपानाने मृत्यू जवळ येतो याची जाणीव असून देखील मद्यपानाचे प्रमाण जास्त आहे· या सर्व कारणांस्तव कामगार शिक्षण वर्गात मद्यपान या समस्येवर मार्गदर्शन केले असावे·

सारणी क्रमांक ३१ :-

कामगारांचे बोफोर्स प्रकरणा विषयी मत दर्शवणारी सारणी.

| बोफोर्स प्रकरणा विषयी मते | कामगारांची संख्या | प्रमाण |
|---|---|---|
| १) राजिव सरकारने दलाली घेतली | ०६ | ५.०० |
| २) अभिताब बच्चनचा हात आहे | ०७ | ५.८३ |
| ३) लाच कोणीही घेतली नाही | ०७ | ५.८३ |
| ४) विन छड्डा यांनी लाच घेतली | ०८ | ६.६७ |
| ५) हिंदूजांनी लाच घेतली | - | - |
| ६) विरोधी पक्षांनी केलेला एक फार्स | १९ | १५.८३ |
| ७) कांहीही सांगता येत नाही | ७३ | ६०.८४ |
| | १२० | १००.०० |

अ) पृथःकरण :-

१) ५ टक्के कामगारांच्या मते बोफोर्स प्रकरणात राजिव सरकारने दलाली घेतली.

२) ५.८३ टक्के कामगारांच्या मते बोफोर्स प्रकरणात अभिताब बच्चनचा हात आहे.

३) ५.८३ टक्के कामगारांच्या मते बोफोर्स प्रकरणात कोणीही लाच घेतली नाही.

४) ६·६७ टक्के कामगारांच्या मते बोफोर्स प्रकरणात विन छड्ड यांनी लाच घेतली·

५) हिंदूजांनी लाच घेतली असे मत कोणीही व्यक्त केले नाही·

६) १५·८३ टक्के कामगारांच्या मते बोफोर्स प्रकरणात विरोधी पक्षांनी केलेला एक फार्स आहे·

७) ६०·८४ टक्के कामगारांच्या मते बोफोर्स प्रकरणा विषयी कांहीही सांगता येत नाही·

ब) <u>स्पष्टीकरण</u> :-

वरील सारणीवरून असे दिसून येते की, संसदेत व देशभर चर्चिला गेलेल्या बोफोर्स कंपनीच्या हवित्झर तोफा खरेदीच्या प्रकरणात कोट्यावधी रूपयाची दलाली दिली गेली पण या विषयी कांहीही सांगता येत नाही असे मत व्यक्त करणा-यांचे जास्त प्रमाण (६०·८४ टक्के) आहे· याचे कारण असे असावे की, हा प्रश्न राजकिय स्वरूपाचा आहे· तसेच उच्च पदस्थ लोकांचा आहे· त्यामुळे आपल्या सारख्या सर्व सामान्य कामगारांना काय करावयाचे आहे असे मत असावे· तसेच ठोस पुरावा कोठेही उपलब्ध नसताना केवळ वर्तमानपत्र आणि विरोधी पक्षानी या विषयी फार गाजाबाजा केला आहे· तसेच या प्रश्नाविषयी कामगारांची द्विधावस्था निर्माण झाली· त्यामुळे सरळ कांहीही सांगता येत नाही असे मत व्यक्त केले·

सारणी क्रमांक ३२ :-

कामगारांचे पंजाब समस्येविषयी मत दर्शविणारी सारणी•

| उपाय | कामगारांची संख्या | प्रमाण |
|---|---|---|
| १) सीमा बंदी करावी | ४० | ३३•३४ |
| २) सुवर्ण मंदिरात अकाली नेत्यांना बंदी घालावी | १५ | १२•५० |
| ३) राष्ट्रपती राजवट लागू करावी | ४८ | ४०•०० |
| ४) लोकनियुक्त संस्कार स्थापन करावे | १२ | १०•०० |
| ५) सरकारने श्वेतपत्रिका प्रसिध्द करावी | ०५ | ०४•१६ |
| | १२० | १००•०० |

अ) पृथःकरण :-

१) ३३•३४ टक्के कामगारांच्या मते पंजाबची समस्या सोडवण्यासाठी सीमा बंदी करण्याचा उपाय योजवा•

२) १२•५ टक्के कामगारांच्या मते पंजाबची समस्या सोडवण्यासाठी अकाली नेत्यांना सुवर्ण मंदिरात जाण्यास बंदी घालावी हा उपाय योजावा•

३) ४० टक्के कामगारांच्या मते पंजाबची समस्या सोडवण्यासाठी राष्ट्रपती राजवट लागू करण्याचा उपाय योजावा•

४) १० टक्के कामगारांच्या मते पंजाबची समस्या सोडवण्यासाठी लोकनियुक्त सरकार स्थान करावे हा उपाय योजावा•

५) ४•१६ टक्के कामगारांच्या मते पंजाबची समस्या सोडवण्यासाठी सरकारने श्वेतपत्रिका प्रसिध्द करावी•

ब) स्पष्टीकरण :-

वरील सारणीवरून असे दिसून येते की, पंजाबची नाजूक व अतिशय गुंतागुंतीची झालेली समस्या सोडवण्यासाठी राष्ट्रपती राजवटीचा व सीमा बंदी करण्याचे उपाय योजावेत असे मत जास्त प्रमाणात (अनुक्रमे ४० टक्के व ३३•३४ टक्के) आहे• सिमाबंदीच्या उपायामुळे शेजारील राष्ट्राकडून जी मदत मिळत आहे ती बंद होईल• ही समस्या संपेपर्यंत राष्ट्रपती राजवटीचा अंमल ठेवला तर शासनास सरकारी पातळीवरून कारवाई करता येईल•